१२ ११ ९१५

**जिल्हा उद्योग केंद्र, ठाणे येथे उद्योग सेतु कार्यान्वित करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्र. उसेतू २००४ /प्र.क्र.७३४/उद्योग २
मंत्रालय मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ३१ जुलै, २००४

वाचा १. विकास आयुक्त (उद्योग) यांचे पत्र दि. ३० जूलै, २००४ व त्या सोबतचा उद्योग सेतू बाबतचा प्रस्ताव
२. सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र. सिओएम १००२/प्र.क्र २४०/०२/३९, दिनांक २३ ऑगस्ट, २००२

**प्रस्तावना:**

माहिती तंत्रज्ञानाच्या सहाय्याने जनतेशी थेट संपर्क साधून जलद व सुलभरितीने एकाच ठिकाणी विविध सेवा उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने एकात्मिक नागरिक सुविधा केंद्र सेतू स्थापन करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाने संदर्भ १ येथील शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित केले आहेत. त्या अनुषंगाने उद्योजकांशी थेट संपर्क साधून जलद व सुलभ रीतीने उद्योगाशी निगडीत विविध सेवा एक खिडकी माध्यमातून एकाच छत्राखाली (सिंगल विंडो) उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीकोनातून जिल्हा उद्योग केंद्र, ठाणे येथे प्रायोगिक तत्वावर उद्योग सेतू स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. सदर प्रकल्पाची रुपरेषा, अंमलबजावणी, इत्यादी बाबत या विभागाच्या तसेच उद्योग संचालनालयाच्या स्तरावर झालेल्या विविध बैठकांमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली. या चर्चेमध्ये ठाणे जिल्ह्यातील औद्योगिक संघटनांनाही सहभागी करण्यात आले होते. उद्योजकांना अत्यावश्यक असलेली ही सेवा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने घेतलेल्या पुढाकारामध्ये आपला सहभाग म्हणून ठाणे बेलापूर औद्योगिक संघटना, नवी मुंबई यांनी उद्योग सेतू साठी आवश्यक software सर्वश्री. एबीएम् नॉलेजवेअर लि. यांच्या मार्फत विनामूल्य पुरविण्याची तयारी दर्शविली आहे. तसेच सर्वश्री. एबीएम् नॉलेजवेअर लि. यांनी सदर उद्योग सेतू त्वरीत कार्यान्वित करण्यासाठी संबंधित कर्मचा-यांना प्रशिक्षण देणे, प्रत्यक्ष कार्यानुभव देणे, इ. सर्व सेवा विनामुल्य देण्याचे मान्य केले.

सदर प्रकल्पाबाबत सर्व संबंधित शासकीय विभाग व यंत्रणा तसेच औद्योगिक संघटनांसह झालेल्या प्रदीर्घ चर्चेअंती घेण्यात आलेल्या निर्णयाच्या आधारे खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय :**

**१. राज्यस्तरीय उद्योग मित्रच्या सहभागातून उद्योग सेतूची स्थापना**

(उद्योजकांना उद्योगाशी निगडीत विविध शासकीय कायदे, नियम व योजनांची माहिती उपलब्ध करुन देणे, सेवेचा दर्जा वाढविणे, उद्योग उभारणीसाठी विविध शासकीय व निमशासकीय संस्थांकडून लागणारे विविध परवाने / निपटारा प्रमाणपत्रे / ना हरकत प्रमाणपत्रे / विविध सेवा इत्यादी बाबत मार्गदर्शन करणे आणि एकाच ठिकाणी या सेवा कालमर्यादेत उपलब्ध करुन देणे) या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी प्रायोगिक तत्वावर जिल्हा उद्योग केंद्र, ठाणे येथे ठाणे बेलापूर औद्योगिक संघटना आणि सर्वश्री एबीएम नॉलेजवेअर लिमिटेड यांच्या सहकार्याने उद्योग सेतू कार्यान्वित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

रोटा प्रिंट/एच–572(500–8–04)1

या पध्दतीने सेवा उपलब्ध करून देण्याबाबत उद्योजकांकडून सातत्याने करण्यात येत असलेली मागणी, सदर सेवेची निकड व उपयुक्तता लक्षात घेता सदर प्रकल्प यशस्वी व्हावा या साठी सुरुवातीला जिल्हा उद्योग केंद्र, ठाणे आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या आस्थापनांमार्फत ठाणे जिल्ह्यातील उद्योजकांना पुरविण्यात येणा-या पुढे नमूद केलेल्या सेवा पूर्णतः केवळ उद्योग सेतू मार्फत वाजवी सेवा शुल्क आकारून उपलब्ध करुन देण्यात येतील. संबंधित कार्यालयांकडून सदर सेवा उद्योजकांना परस्पर देण्यांत येणार नाहीत.

तदनंतर इतर शासकीय / निमशासकीय संस्थांच्या सेवा उद्योग सेतूच्या माध्यमातून टप्याटप्याने उद्योजकांना उपलब्ध करुन देण्याचा शासनाचा मानस आहे. सदर सेतू कार्यान्वित करण्यासाठी लागणारा अनावर्ती खर्च राज्यस्तरीय उद्योग-मित्र कडून भागविण्यात येईल. उद्योग सेतूच्या दैनंदिन कामकाजातून प्राप्त होणा-या सेवाशुल्काच्या महसुलाची रक्कम व उद्योग सेतूच्या आवर्ती खर्चाची रक्कम यात तूट आल्यास, तूटीच्या व्यवस्थापनाबाबत स्वतंत्ररित्या आदेश निर्गमित करण्यात येतील.

**२. उद्योग सेतूची कार्यपध्दती**

उद्योग सेतूची कार्यपध्दती व सर्वसाधारण व्यवस्थापनाचे संनियंत्रण करण्यासाठी आणि प्रकल्प यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी खालील जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय समित्या काम पाहतील.

जिल्हास्तरीय समिती जिल्हा सेतू सोसायटीची उप समिती म्हणून काम पाहील.

**<u>जिल्हास्तरीय समिती :</u>**

| | | |
|---|---|---|
| १. | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र , ठाणे | अध्यक्ष |
| २ | प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, ठाणे. | सदस्य |
| ३. | ठाणे बेलापूर औद्योगिक संघटनेचा प्रतिनिधी | सदस्य |
| ४. | ठाणे जिल्ह्यातील औद्योगिक संघटनांचे दोन प्रतिनिधी | सदस्य |
| ५ | जिल्हास्तरीय सेतू सोसायटी, ठाणे यांचा प्रतिनिधी | सदस्य |
| ६. | उद्योग उप संचालक, मुंबई प्राधिकरण विभाग,ठाणे | सदस्य सचिव |

**<u>जिल्हा स्तरीय समितीची कार्यकक्षा</u>**

१. विकास आयुक्त (उद्योग) व अध्यक्ष, राज्य स्तरीय उद्योग मित्र यांनी विहित केलेल्या निकषांप्रमाणे उद्योग सेतू कार्यान्वित करणे,

२. केंद्राच्या कामकाजाचे सर्वसाधारण व्यवस्थापन करणे, विविध सेवा पुरविण्याबाबतचा सुधारित कालावधी वेळोवेळी निश्चित करणे,

३. सेवा प्रणाली अधिक परीणामकारक, किफायतशिर, सोईस्कर आणि नियम व कार्यपध्दती सुलभ करण्यासाठी वेळोवेळी सुधारणा करणे व त्याबाबत उपाय सुचविणे (BPR),

४. इतर संबंधित शासकीय विभाग व यंत्रणांच्या सेवा उद्योग सेतूवर टप्याटप्याने कार्यान्वित करण्याबाबत कार्यवाही करणे,

५. नवीन गुंतवणूकदारांच्या गुंतवणूकीच्या इरादांना त्वरीत मूर्तस्वरूप देण्यासाठी तसेच अस्तित्वातील उद्योगांना अधिकाधिक स्पर्धात्मक होण्यासाठी आवश्यक साधनसामग्री (database) उद्योग सेतूवर तसेच वेबसाईट्वर उपलब्ध करणे.

**राज्यस्तरीय समिती :**

प्रधान सचिव (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय समितीकडून उद्योग सेतू व जिल्हास्तरीय समितीच्या कामाबाबत मार्गदर्शन व सनियंत्रण करण्यात येईल. या समितीची घटना व कार्यकक्षा या बाबत स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येतील.

३. **प्रकल्पाची व्याप्ती :-**

प्रथमत: प्रायोगिक तत्वावर उद्योग सेतूची स्थापना जिल्हा उद्योग केंद्र, ठाणे येथे करण्यात येईल. जिल्हा उद्योग केंद्र, ठाणे आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या आस्थापनांमार्फत पुढे नमूद केलेल्या सेवा उद्योग सेतूवर ठाणे जिल्ह्यातील उद्योजकांना उपलब्ध करुन देण्यात येतील. उद्योजकांना पुरविण्यात येणा-या या सेवा पूर्णत: केवळ उद्योग सेतू मार्फत जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेले वाजवी सेवाशुल्क आकारून उपलब्ध करुन देण्यात येतील. संबंधित कार्यालयांकडून सदर सेवा उद्योजकांना परस्पर देण्यांत येणार नाहीत. तद्नंतर इतर शासकीय / निमशासकीय संस्थांच्या सेवा उद्योग सेतूच्या माध्यमातून टप्याटप्याने उद्योजकांना उपलब्ध करुन दिल्या जातील. सदर सेतूच्या कार्याचा आढावा घेवून आवश्यक सुधारणा विचारात घेऊन इतर जिल्ह्यात उद्योग सेतू स्थापन करण्याबाबत शासन राज्यस्तरीय समितीच्या सल्ल्याने आवश्यक तो निर्णय घेईल.

४. **उद्योग सेतू केंद्राची रचना व कार्यप्रणाली :**

जिल्हास्तरीय सेतूच्या धर्तीवर जिल्हा उद्योग केंद्र, ठाणे कार्यालयामधील सल्लामसलत कक्षामध्ये उद्योग सेतू कार्यान्वित करण्यात येईल. उद्योग संचालनालयाने सादर केलेल्या प्रस्तावात नमूद केल्यानुसार सदर केंद्रासाठी लागणारे फर्निचर, हार्डवेअर, सॉफ्टवेअर व इतर अनुषंगिक सुविधा / साहित्य तसेच उद्योजकांच्या सोईसाठी वातानुकूलित यंत्रणा इत्यादी वरील खर्च राज्यस्तरीय उद्योग मित्र कडून भागविण्यात येईल. उद्योग सेतूमध्ये कॉंटर्स, संगणक यंत्रणा, पर्यवेक्षकांसाठी व अभ्यागतांसाठी बसण्याची व्यवस्था, अभ्यागतांसाठी पिण्याचे कॉंटर्स, इ. सुविधा सेतूवर उपलब्ध करण्यात याव्यात.

उद्योग सेतूची कार्यप्रणाली सर्वसाधारणपणे सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भीय शासन निर्णय दि.२३.०८.२००२ च्या मुद्दा क्र. ७ मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे राहील. तथापि, त्यातील उप मुद्दा क्र. ७.५ व ७.६ लागू राहणार नाहीत. उद्योग सेतूवर उपलब्ध सेवांचा तपशिल व इतर उपयुक्त माहिती तसेच उद्योजकांनी सेतूकडे सादर केलेल्या अर्जांची सद्यस्थिती इंटरनेट द्वारे कोणत्याही वेळी आणि कोठूनही उपलब्ध व्हावी यासाठी शासनाच्या अधिकृत वेबसाईटवर "udyog.maharashtra.gov.in" या URL वर उद्योग सेतूसाठी होम पेज कार्यान्वित करण्यात येईल.

५. **उद्योग सेतू केंद्राचे व्यवस्थापन, देखभाल व दुरूस्ती ;**

जिल्हा उद्योग केंद्र, ठाणे येथे प्रायोगिक तत्वावर स्थापन करावयाच्या उद्योग सेतूच्या व्यवस्थापनाची संपूर्ण जबाबदारी महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, ठाणे यांचेवर राहील. जिल्हा उद्योग केंद्राने जिल्हास्तरीय समितीच्या सुचनांप्रमाणे उद्योग सेतूचे व्यवस्थापन करावे. या सेतूच्या कामकाजासाठी कार्यालयातील उपलब्ध कर्मचा-यांच्या सेवा घ्यावयाच्या आहेत.

सेतूच्या कामकाजात करावयाच्या सुधारणा व अडचणी बाबतचा आढावा जिल्हास्तरीय समितीमध्ये घेऊन त्यास मान्यता / निरसन करून घेणे, हिशेब लेखे ठेवणे व जिल्हास्तरीय समितीस नियतकालिक अहवाल सादर करणे, जडवस्तू संग्रह आणि इतर साहित्याची देखभाल व परिरक्षण करणे, सेतूचा आवर्ती खर्च सेवा शुल्काद्वारे प्राप्त झालेल्या (महसूल) रक्कमेतून भागविणे, सेतूकडील अशा महसूली शिल्लक रकमेचे विनियोजन जिल्हास्तरीय समितीच्या मान्यतेने करणे, इ. बाबी सेतूच्या व्यवस्थापनामध्ये अंतर्भूत राहतील. उद्योग सेतूच्या दैनंदिन व्यवस्थापनाच्या बाबी शासकीय लेखापरीक्षणाच्या कक्षेत राहणार नाही. तथापि, उद्योग सेतू परीणामकारक पध्दतीने कार्यरत ठेवण्यासाठी आवश्यक बाबींवरील खर्च जिल्हास्तरीय समितीच्या मान्यतेने करण्यात यावा.

३ उद्योग सेतूचे सर्वसाधारण व्यवस्थापन संदर्भीय सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दिनांक२३.०८.२००२ च्या मुद्दा क. ५ मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे राहील.

६. **उद्योग सेतू मार्फत पुरवावयाच्या सेवा :**

उद्योग सेतू मधून जिल्हा उद्योग केंद्र, ठाणे आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पुढील सेवा उपलब्ध करून देण्यात येतील.

**जिल्हा उद्योग केंद्राच्या सेवा:**

1. **Permission to purchase agricultural land exceeding 10 Ha for bonafide industrial purpose.**
2. **Exemption u/s. 20 of the Urban Land (Ceiling & Regulation) Act, 1976, for use of land for own industrial purpose**
3. **All types of provisional registrations and amendments thereto**
4. **All types of permanent registrations and amendments thereto**
5. **Letter of intent for SSI and Non-SSI information technology units**
6. **NOC under Industrial Location Policy for MMR for SSI**
7. **Location Clearance for Non-SSI units under Industrial Location Policy for MMR**
8. **License for Supply and Distribution of Lubricating Oil & Greases under the Lubricating Oil & Greases (Processing, Supply and Distribution Regulation) Order 1987.**
9. **Permission to run units on Conductor Basis**

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या सेवा:**

1. Offer for allotment of plot / sheds / galas
2. Allotment letter for plot / sheds / galas
3. Handing over possession of plot / shed / gala and grant of NOCs for telephone, mortgage, power, etc
4. Execution / renewal of lease documents [Lease Agreement]
5. Extension of time limit for taking effective steps
6. Amalgamations and waiver of marginal distance
7. Transfer of plot / sheds / galas
8. Approval of building plans
9. ULC Clearance - Exemption u/s. 20 of the Urban Land (Ceiling & Regulation) Act, 1976
10. Approval of grant of water connection and sanitation
11. Provisional NOC from CFO and FA
12. Grant of Building Completion Certificate (BCC) / Occupancy Certificate
13. Permission for sub-lease of premises

**७. विविध सेवांसाठी आकारावयाचे सेवाशुल्क :**

ना नफा ना तोटा तत्वावर उद्योग सेतू चालविण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. उद्योग सेतूवर उद्योजकांना सेवा सुविधा पुरविण्यासाठी सुरुवातीला जिल्हा उद्योग केंद्र व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या वर क. ६ येथे नमुद केलेल्या सेवांसाठी प्रत्येकी १००/- रुपये शुल्क रोखीने आकारण्यात यावे. तसेच या सेतू मार्फत देय सेवा / सुविधांसाठी स्विकारण्यांत येणारा एकंदर आकार हा शासनाने देय सेवांसाठी निश्चित केलेल्या शुल्काच्या अतिरिक्त राहील. ठराविक कालावधीनंतर जमाखर्चाचा आढावा घेऊन सुधारित शुल्क आकारण्याबाबत जिल्हा स्तरीय समितीने आवश्यक प्रस्ताव विकास आयुक्त (उद्योग) यांच्याकडे निर्णयार्थ सादर करावा.

**८. आर्थिक बाबी :**

(अ) उद्योग सेतू केंद्रातून मिळणा-या रकमेच्या आहरण व संवितरणासाठी महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांनी त्यांच्या कार्यालयातील जबाबदार अधिका-याची नेमणूक करावी. जिल्हा सेतू सोसायटीच्या माध्यमातून उद्योग सेतूकरीता स्थानिक राष्ट्रीयीकृत बँकेमध्ये खाते उघडण्यात यावे. जिल्हा सेतू सोसायटीसह उद्योग सेतूच्या संलग्नतेबाबतच्या अटी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय सोसायटीकडून निश्चित करण्यांत येतील. उद्योग सेतूच्या खात्यातील रक्कम फक्त धनादेशाद्वारे संवितरीत करण्याचे अधिकार आहरण व संवितरण अधिका-यास असतील. या उद्योग सेतूच्या जमाखर्चाचे नियोजन जिल्हास्तरीय समितीच्या सल्ल्यानुसार करण्यांत यावे.

(ब) रक्कम जमा करण्याची व वितरित करण्याची कार्यप्रणाली :

जमाखर्चासाठी स्वतंत्र कॅशबुक व इतर अभिलेख ठेवण्यात यावेत. उद्योग सेतूच्या व्यवस्थापनासाठी करावयाचा खर्च महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांच्या पूर्व मान्यतेने बँकेत जमा होणा-या सेवाशुल्कामधून करावा. महिनाअखेर आहरण व संवितरण अधिका-याने जमा झालेल्या एकूण रकमेचा व खर्चाचा ताळमेळ घ्यावा व त्याचा पडताळणी अहवाल जिल्हास्तरीय समिती समोर वेळोवेळी ठेवावा.

९. लेखा परिक्षण :

उद्योग सेतूचे लेखा परिक्षण व खर्चमेळ राज्यस्तरीय समितीच्या मान्यतेने विहित कार्यपध्दतीनुसार केले जाईल.

हे आदेश मंत्रीमंडळाच्या दि. २४ एप्रिल, २००२ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने तसेच माहिती तंत्रज्ञान संचालनालय, सामान्य प्रशासन विभाग यांच्या सहमतीने व राज्यस्तरीय उद्योग मित्रच्या प्रस्तावाप्रमाणे निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(मे.अ. काळे)
शासनाचे उप सचिव

प्रति,
मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. उपमुख्यमंत्री यांचे उप सचिव
मा. मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा / महाराष्ट्र विधान परिषद
मा. मुख्य सचिव
सर्व अतिरिक्त मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव
राज्यस्तरीय शिखर सोसायटीचे सर्व सदस्य
विकास आयुक्त (उद्योग), मुंबई (पाच प्रती)
मु.का.अ. , म.औ.वि. महामंडळ, मुंबई (तीन प्रती)
संचालक, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, मुंबई ( तीन प्रती )
सर्व विभागीय आयुक्त
जिल्हाधिकारी, ठाणे
सर्व जिल्हाधिकारी
उद्योग उप संचालक, मुंबई प्राधिकरण विभाग, जिल्हा उद्योग केंद्र, ठाणे
महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, ठाणे (तीन प्रती)
सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र
प्रादेशिक अधिकारी,महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, ठाणे.
उद्योग, ऊर्जा व कामगार विभागातील सर्व कार्यासने
मा. प्रधान सचिव (उद्योग) यांचे स्वीय सहाय्यक
निमंत्रक, उद्योग मित्र
अध्यक्ष, ठाणे बेलापूर औद्योगिक संघटना, ठाणे
ठाणे जिल्हा सेतु सोसायटीचे अध्यक्ष व सर्व सदस्य
ठाणे जिल्हयातील सर्व औद्योगिक संघटना
ठाणे जिल्हयातील सर्व लघु उद्योग संघटना
निवड नस्ती